


किशोरकुमार कभी अलविदा ना कहना...

अविस्मरणीय गायक-अभिनेता किशोरकुमार यांच्या चौदाव्या पुण्यतिथीनिमित्त त्याच्या फिल्मी कारकीर्दीची झलक.

४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्य प्रदेशातील खंडवा येथे जन्मलेला, तेथील सुप्रसिद्ध वकील कुंजलाल गांगुली यांचा हा सर्वात धाकटा मुलगा. खरं तर त्याला गायक व्हायचं होतं. पण मोठा भाऊ अशोककुमार त्याकाळी हिंदी चित्रपटात नायक म्हणून चांगलाच नावारूपाला आला होता. म्हणून मग किशोरलाही नाइलाजाने अभिनेता बनावं लागलं. अभिनेता म्हणून *नई दिल्ली, आशा, चलती का नाम गाडी* आणि *झुमरू*सारख्या चित्रपटांनी त्याला यश दिलं. पण अभिनयाबरोबरच *रागिनी* आणि *शरारत*मध्ये किशोरकुमारला महंमद रफीच्या सांगण्यावरून पार्श्वगायन करावं लागलं. १९६४ला देव आनंदच्या *जिद्दी*मधील 'मरने की दुवाएं क्यों मागूं...' हे गाणं गाऊन त्याने खेमचंद प्रकाशकडून शाबासकी मिळवली होती.

प्यारपासून एस.डी.बर्मनबरोबर किशोरची जोडी जमली ती *गाइड, ज्वेलथीफ, तीन देवीयाँ* आणि *पेईंग गेस्ट*पर्यंत. 'गाता रहे मेरा दिल...', 'माना जनाब ने पुकारा नही...' आणि 'ख्वाब हो तुम या कोई हकीकत...'मुळे देव आनंदसाठी किशोरच्या आवाजाला मान्यता मिळाली. राजेश खन्नाच्या *आराधना*मध्ये 'रूप तेरा मस्ताना...' आणि 'मेरे सपनो की रानी...' ही दोन गीतं गायल्यानंतर राजेश खन्नासाठीही किशोरचाच आवाज कायमचा झाला. अमिताभसाठी *मुकद्दर का सिकंदर, शराबी, मिली, डॉन, अमर अकबर अॅन्थनी*मध्ये किशोरनी आवाज दिला.

सलील चौधरींच्या संगीत दिग्दर्शनातील *हाफ टिकीट* या चित्रपटात किशोरने स्त्री आणि पुरुष या दोन्ही आवाजात 'आके सिटी लगी...' हे गीत गाऊन लोकांना चकित केलं.

त्याच्या घराबाहेर एक फलक टांगलेला होता. त्यावरचा मजकूर असा होता. "ये पागलखाना है. इस घर मे अपनी जोखम पर ही प्रवेश करे." अशी पाटी होती. त्याच्या मिश्किल स्वभावाचा हा एक नमुना.

किशोरने 'रूप तेरा मस्ताना...' (*आराधना*), 'दिल ऐसा कीसी ने मेरा तोडा...' (*अमानुष*), 'खायके पान बनारसवाला...' (*डॉन*), 'हजार राहे...' (*थोडी सी बेवफाई*), 'पग घुंगरू...' (*नमक हलाल*), *अगर तुम न होते*चं शीर्षक गीत, 'मंजीले अपनी जगह...' (*शराबी*) आणि 'सागर किनारे...' (*सागर*) या गाण्यांसाठी आठ वेळा फिल्मफेअर अॅवॉर्ड मिळवला.

अठ्ठावन्नाव्या वर्षी, १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोरने आपली जीवनयात्रा संपवली. त्याला श्रद्धांजली देताना त्याचंच एक गीत आठवतं 'बिच राह मे दिलबर बिछड जाये क्युं हमजीगर और सुनी सुनी लागे तुम्हे, जीवन की ये डगर, हम लौट आयेंगे तुम युंही बुलाते रहना, कभी अलविदा न कहना...'

क्र.	चित्रपट	नायिका	दिग्दर्शक	साल
१.	*शिकारी*	–	सावक वाच्छा	१९४६
२.	*शहनाई*	–	पी.एल.संतोषी	१९४७
३.	*सती विजया*	–	के.जे.परमार	१९४८
४.	*जिद्दी*	–	शाहीद लतीफ	१९४८
५.	*कनीझ*	–	कृष्णकुमार	१९४९
६.	*मुकद्दर*	रजनी	अरविंद सेन	१९५०
७.	*आंदोलन*	मंजू	फणी मजूमदार	१९५१
८.	*छम छम छम*	मंजू	पी.एल.संतोषी	१९५२
९.	*तमारा*	रेहाना	फणी मजूमदार	१९५२
१०.	*फरेब*	शकुंतला	शाहीद लतीफ	१९५३
११.	*लडकी*	वैजयंतीमाला	एम.व्ही.रहमान	१९५३
१२.	*लहरें*	वैजयंतीमाला	एन.एस.रैविएल	१९५३
१३.	*अधिकार*	उषाकिरण	मोहन सेहगल	१९५४
१४.	*धोबी डॉक्टर*	उषाकिरण	फणी मजूमदार	१९५४
१५.	*इल्जाम*	मीनाकुमारी	आर.सी.तलवार	१९५४
१६.	*मिस. माला*	वैजयंतीमाला	जयंत देसाई	१९५४
१७.	*नौकरी*	शीला रामानी	बिमल राय	१९५४
१८.	*तीन तस्वीरे*	शीला रामानी	एस.एस.सोलंकी	१९५४

१९. *बाप रे बाप*	चांद उस्मानी	ए.आर. कारदार	१९५५
२०. *चार पैसे*	निम्मी	एन. के. खिरी	१९५५
२१. *मदभरे दिन*	बिना राय	हेमचंद्र	१९५५
२२. *रुख्साना*	मीनाकुमारी	आर.सी.तलवार	१९५५
२३. *आबरू*	कामिनी कौशल	चतुर्भुज दोशी	१९५६
२४. *भागम भाग*	शशिकला	भगवान दादा	१९५६
२५. *भाईभाई*	निम्मी	एम.व्ही.रहमान	१९५६
२६. *मेमसाहेब*	मीनाकुमारी	आर.सी.तलवार	१९५६
२७. *ढाके की मलमल*	मधुबाला	जे.के.नंदा	१९५६
२८. *परिवार*	उषाकिरण	असित सेन	१९५६
२९. *पैसा ही पैसा*	शशिकला	महरीब	१९५६
३०. *नया अंदाज*	मीनाकुमारी	के.अमरनाथ	१९५६
३१. *नई दिल्ली*	वैजयंतीमाला	मोहन सेहगल	१९५६
३२. *आशा*	वैजयंतीमाला	एम.व्ही.रहमान	१९५७
३३. *बंदी*	मधुबाला	सत्येन बोस	१९५७
३४. *बेगुनाह*	शकील	नरेंद्र सूरी	१९५७
३५. *मिस. मेरी*	जमुना	प्रसाद	१९५७
३६. *मुसाफिर*	जमुना	हृषिकेश मुखर्जी	१९५७
३७. *चलती का नाम गाडी*	मधुबाला	सत्येन बोस	१९५८
३८. *चंदन*	मधुबाला	एम.व्ही. रहमान	१९५८
३९. *दिल्ली का ठग*	नूतन	एस.डी.बर्मन	१९५८
४०. *कभी अंधेरा कभी उजाला*	नूतन	सी.पी.दीक्षित	१९५८
४१. *रागिणी*	पद्मिनी	राजन	१९५८
४२. *चाचा जिंदाबाद*	अनीता गुहा	ओम प्रकाश	१९५९
४३. *जाल साझ*	माला सिन्हा	अरविंद सेन	१९५९
४४. *शरारत*	मीनाकुमारी	एच.एस.रवैल	१९५९
४५. *अपना हाथ जगन्नाथ*	सईदा खान	मोहन सहगल	१९६०
४६. *बेवकूफ*	माला सिन्हा	आय.एस.जोहर	१९६०
४७. *गर्लफ्रेंड*	वहिदा रहेमान	सत्येन बोस	१९६०
४८. *महलों का ख्वाब*	मधुबाला	हैदर	१९६०
४९. *करोडपती*	मधुबाला	मोहन सहगल	१९६१
५०. *झुमरू*	मधुबाला	शंकर मुखर्जी	१९६१
५१. *बॉम्बे का चोर*	माला सिन्हा	एस.डी.नारंग	१९६२
५२. *हाफ टिकिट*	मधुबाला	कालिदास	१९६२
५३. *मनमौजी*	साधना	कृष्णन पंजी	१९६२
५४. *नॉटी बॉय*	कल्पना	शक्ती सामंता	१९६२
५५. *रंगोली*	वैजयंतीमाला	अमरकुमार	१९६२
५६. *एक राज*	कल्पना	शक्ती सामंता	१९६३
५७. *बागी*	कुमकुम	शाहजादा	१९६४
५८. *दाल में काला*	निम्मी	सत्येन बोस	१९६४
५९. *दूर गगन की छांव में*	सुक्रिया चौधरी	किशोरकुमार	१९६४
६०. *गंगा की लहरें*	कुमकुम	देवी शर्मा	१९६४



अलबेला ऑल राऊंडर किशोरकुमार: घराबाहेर 'ये पागल खाना है' अशी पाटी लावलेली.

६१. *मिस्टर एक्स इन बॉम्बे*	कुमकुम	शांतीलाल सोनी	१९६४
६२. *हम सब उस्ताद है*	अमिता	मारुती	१९६५
६३. *श्रीमान फंटूश*	कुमकुम	शांतीलाल सोनी	१९६५
६४. *अकलमंद*	सोनिया साहनी	रूप के.शोरी	१९६६
६५. *देवर*	मुमताज	मोहन सहगल	१९६६
६६. *लडका-लडकी*	मुमताज	सोम हकसर	१९६६
६७. *प्यार किये जा*	कल्पना	श्रीधर	१९६६
६८. *अलबेला मस्ताना*	आशा नाडकर्णी	बी.जे.पटेल	१९६७
६९. *दुनिया नाचेगी*	कुमकुम	के.परवेज	१९६७
७०. *हम दो डाकू*	गंगा	किशोरकुमार	१९६७
७१. *दो दूनी चार*	कुमकुम	के.परवेज	१९६८
७२. *हाय मेरा दिल*	कुमकुम	वेद मदान	१९६८
७३. *पडोसन*	कुमकुम	ज्योती स्वरूप	१९६८
७४. *पायल की झंकार*	ज्योती	एम.व्ही.रहमान	१९६८
७५. *साधू और शैतान*	ज्योती	एम.भीमसिंह	१९६८
७६. *श्रीमानजी*	शाहिदा	राम दयाल	१९६८
७७. *बेटी* (पाहुणा कलाकार)	–	हरमेश मल्होत्रा	१९६९
७८. *आंसू और मुस्कान*	–	पी. माधवन	१९७०
७९. *दूर का राही*	तनूजा	किशोरकुमार	१९७१
८०. *हंगामा*	हेलन	एस.एम.अब्बास	१९७१
८१. *बॉम्बे टू गोवा* (पाहुणा कलाकार)	–	एस.रामनाथ	१९७२
८२. *प्यार दीवाना*	मुमताज	अमर चॅटर्जी	१९७२
८३. *बढती का नाम दाढी*	शीतल	किशोरकुमार	१९७४
८४. *लव इन बॉम्बे*	शीतल	सोमू मुखर्जी	१९७५
८५. *एक बाप छ बेटे* (पाहुणा कलाकार)	–	मेहमूद	१९७८
८६. *शाबाश डॅडी*	योगिता बाली	किशोरकुमार	१९७९
८७. *चलती का नाम जिंदगी*	विजया	किशोरकुमार	१९८१
८८. *अपमान*	–	डॉ. अमि अस्थान	१९८२
८९. *सुन सजना*	–	चंदर बहल	१९८२
९०. *दूर वादियों में कहीं*	श्यामली	किशोरकुमार	१९८२
९१. *मां* (अप्रदर्शित)	कुमकुम	फणी मजुमदार	१९८२